पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र. ०४ दिनांक २५/०१/२०२४

# स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचेकडून मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघड करुन एकूण ७ मोटारसायकल जप्त.

पालघर जिल्हयामध्ये मोटार सायकल चोरीच्या गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेवून श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांना मार्गदर्शन करुन कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने श्री. अनिल विभुते, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांनी वाहन चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीत व चोरीस गेलेल्या वाहनांचा शोध घेवून गुन्हे उघडकीस आणणेकरीता पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, पोहवा./९३७ संदीप सरदार, पोहवा./१५७६ कैलास पाटील, पोहवा./१६८१ दिनेश गायकवाड, पोहवा./२२६ राकेश पाटील व पोहवा./३२६ संजय धांगडा सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे पथक बोईसर पोलीस ठाण्याचे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीता रवाना केले.

डहाणू पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. १६/२०२४ भादंविसं कलम ३७९ प्रमाणे अज्ञात आरोपीकडून मोटार सायकल चोरी झालेबाबत गुन्हा दाखल होता. सदर गुन्हातील संशयीत आरोपी १) विधी संघर्षित बालक वय १७ वर्षे २) विधी संघर्षित बालक, वय १७ वर्षे ३) विधी संघर्षित बालक, वय १७ वर्षे सर्व रा. साईलोकनगर, गणेशनगर, बोईसर ता. जि. पालघर असे मिळुन आले. त्यांचेकडे कसून चौकशी केली असता त्यांनी वरील गुन्हा केल्याचे कबुल केले. तसेच मे २०२३ व ऑगस्ट २०२३ मध्ये डहाणू रेल्वे स्टेशन येथुन एक होन्डा कंपनीची सीबी साईन मोटार सायकल क्र. MH48BU3417 व हिरो कंपनीची पॅशन प्रो मोटार सायकल क्र. MH48W3054 ह्या चोरी केल्याचे तसेच एक रेडमी कंपनीचा मोबाईल चोरी केल्याचे कबुल केले.

त्यामुळे डहाणु पोलीस ठाणे येथील खालील दाखल गुन्हे उघड झाले आहेत.

**१) डहाणू पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १६/२०२४ भादंविसं कलम ३७९.**
**२) डहाणू पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १२७/२०२३ भादंविसं कलम ३७९.**
**३) डहाणू पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १८८/२०२३ भादंविसं कलम ३७९.**

त्याचप्रमाणे वरील विधीसंघर्षीत बालके १ व २ यांचेसह विधीसंघर्षीत बालक वय १६ वर्षे ८ महिने यांनी सफाळा परीसरातुन १) हिरो होन्डा कंपनीची पॅशन प्रो मोटार सायकल क्र. MH04EA4036 २) होन्डा कंपनीची ड्रिम युगा मोटार सायकल क्र. MH48AR3074 ३)

हिरो होन्डा कंपनीची स्प्लेंडर प्रो कंपनीची मोटार सायकल क्र. MH48AD4592 अशा ३ मोटार सायकल चोरी केल्याचे कबुल केलेले आहे. वरील मोटार सायकल पैकी MH04EA4036 हि विधीसंघर्षीत बालक वय १६ वर्षे ८ महिने याचेकडे ठेवुन इतर दोन मोटार सायकल क्र. MH48AD4592 व MH48AR3074 ह्या अनुक्रमे १) गुलशनकुमार जनार्दन गोस्वामी वय २१ वर्षे रा. साईलोकनगर, शिव मंदीराजवळ बोईसर ता. जि. पालघर मुळ रा. ग्राम जमुई, पो. खैरा, पोलीस ठाणे खैरा, ता. जमुई राज्य बिहार २) यशवंत लक्ष्मण गोस्वामी वय २३ वर्षे रा. साईलोकनगर शिव मंदीराजवळ, बोईसर ता. जि. पालघर मुळ रा. ग्राम जितपुर पो. समशा, पोलीस ठाणे बखरी बजार, ता. जि. बेगुसराय राज्य- बिहार यांना विकल्याचे सांगीतले. त्यामुळे मोटार सायकल विकत घेणारे आरोपीत यांचा शोध घेतला असता ते मिळुन आले असुन त्यांनी सदरच्या मोटार सायकल ह्या अप्रामाणिकपणे स्विकारल्याचे कबुल केले आहे. त्यामुळे सफाळा पोलीस ठाणे येथील खालील दाखल गुन्हे उघड झाले आहेत.

**१) सफाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०३/२०२४ भादंविसं कलम ३७९**

**२) सफाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०४/२०२४ भादंविसं कलम ३७९**

**३) सफाळा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ०५/२०२४ भादंविसं कलम ३७९**

वरील डहाणु व सफाळा पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्ह्यातील सर्व एकूण ७ मोटार सायकल व एक मोबाईल असा एकूण १०० टक्के मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढिल कारवाई डहाणु व सफाळा पोलीस ठाणे यांचेकडून करण्यात येत आहे.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. पंकज शिरसाट, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/अनिल विभुते, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, पोउपनि/स्वप्नील सावंतदेसाई, पोहवा./९३७ संदीप सरदार, पोहवा./१५७६ कैलास पाटील, पोहवा./१६८१ दिनेश गायकवाड, पोहवा./२२६ राकेश पाटील व पोहवा./३२६ संजय धांगडा सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, पालघर, पोशि/१४६८ अक्षय शेट्ये, पोशि/वाल्मिक पाटील नेमणुक सायबर पोलीस ठाणे, पालघर यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.